# राजर्षी शाहू आणि कांशीराम





東京外国語大学図書館
0000522201

प्रा. पी.एस.चंगोले
एम. कॉम., एम.ए. (अर्थ.,समाज.,इति.,राज्य.,
डॉ.आंबेडकर विचारधारा,लोक प्रशासन)एम.फिल.,एल.एल.एम.

# राजर्षी शाहू छत्रपतींची खास आज्ञा

२६ जुलै, १९०२ ला राजर्षी शाहू छत्रपतींनी बहुजन समाजाला पन्नास टक्के आरक्षण देण्याची क्रांतिकारी घोषणा केली होती. आरक्षण धोरणातंर्गत नियुक्त केलेल्या बहुजन समाजातील विविध जातींच्या कर्मचाऱ्यांशी उच्चवर्णिय अधिकाऱ्यांनी कसे वागावे या संदर्भातील राजषी शाहू छत्रपतींची खास आज्ञा -

**'कोल्हापूर इलाख्यांतील रेव्हिन्यू, ज्युडिशिअल आदिकरून सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानांत जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्यांची वरील प्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोहोचल्यापासून सहा आठवड्यांच्या आंत नोटीस देऊन राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही. आमची अशी इच्छा आहे की, आमच्या राज्यांतील कोणाही इसमाला जनावराप्रमाणे न वागविता मनुष्य प्राण्याप्रमाणे वागवावे.'**

**कोल्हापूर** **(सही) शाहू छत्रपती**

(राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, संपादक भ. बा. जाधव, १९७१, परिशिष्ट दुसरे पृ. ५ -६)

# राजर्षी शाहू छत्रपतींच्या धोरणांप्रमाणे चालणारी बहुजनांची राजसत्ता निर्माण करणे हेच आमचे ध्येय !

**'राजर्षी शाहू छत्रपती आदर्श राज्यकर्ते व उत्कृष्ट प्रशासक होते. त्यांची प्रशासकीय यंत्रनेवर मजबूत पकड होती. त्यांच्या विचारधारेनुसार बहुजनांची राजसत्ता निर्माण करूण ती राबविणे हेच आमचे राजकीय ध्येय आहे. राजर्षींच्या विचारांचा संपूर्ण देशात प्रचार व प्रसार करण्याची नितांत गरज आहे. पुढील वर्षीपासून आम्ही राजर्षी शाहू छत्रपतींच्या जयंती समारोहाचे संपूर्ण देशात आयोजन करून त्यांच्या जीवन कार्याचा व संदेशाचा प्रचार करू ! ही आमची नैतिक जबाबदारी आहे.'**

**'महाराष्ट्रात अनेक महापुरुषांच्या नावांची विद्यापीठे आहेत. त्याच प्र[illegible] पुणे येथील विद्यापीठाला राजर्षी शाहू छत्रपतींचे नाव जोडले तर त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केल्यासारखे होईल ! बहुजन समाजाच्या 'पुणे विद्यापीठास राजर्षी शाहू छत्रपतींचे नाव देण्यात यावे' ह्या उदात्त मागणीस माझा सक्रीय पाठिंबा आहे.'**

**- मा. कांशीराम**

(२६ जुलै, १९९४ ला पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केलेले विचार)